Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## March-23

**(CCCXCVIII) 398**

# Research Methodology in Languages & Social Sciences




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social Research & Development Training Institute Amravati**

**Executive Editor**
**Dr. Pawar B. T.**
**Principal**
**Late Dr. S. S. College Kalamnuri, Dist.- Hingoli**

**Editor**
**Kendre D. B.**
**Dept. of Hindi,**
**Late Dr. S. S. College Kalamnuri, Dist. - Hingoli**

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com* 145 Aadhar Publications

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CCCXCVIII) 398-B
ISSN : 2278-9308
March , 2023



| | | |
|---|---|---|
| 23 | सामाजिक संशोधनात प्रश्नावलीची उपयुक्तता — प्रा.डॉ. हुरगूळे एन. आर. | 86 |
| 24 | संशोधनात माहिती संकलनाच्या पध्दती आणि प्रश्नावली : एक अभ्यास — प्रा.माणिक भिकाजीराव डोखळे | 90 |
| 25 | संशोधनातील तथ्य संकलन पद्धती. — संतोष दत्तराम जाधव | 96 |
| 26 | सामाजिक संशोधनातील मुलाखत सुची चे गुण - दोष — डॉ. रेखा बालाजीराव पाटील | 102 |
| 27 | इतिहास लेखनामध्ये ॲनल्स परंपरेचे योगदान — डॉ. विजयकुमार प्रल्हादराव भांजे | 105 |
| 28 | सामग्री विश्लेषण आणि लेखन — प्रा. राखी रामकृष्ण इंगळे | 108 |
| 29 | प्रश्नावली चे प्रकार — प्रा. डॉ. रमेश वि. मोरे | 112 |
| 30 | संशोधन कार्यात नमुना निवड आणि त्याचे फायदे — प्रा. डॉ. डी. एस.केंद्रे | 115 |
| 31 | संशोधनातील नमुना निवडीची तंत्रे — डॉ. गणपत रामसिंग पवार | 119 |
| 32 | उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरता : एक भौगोलिक अभ्यास — प्रा.डॉ.शिरमाळे महेबुबपाशा बाबूमीयाँ | 123 |
| 33 | काव्य समीक्षा आणि संशोधनाच्या दिशा : विशेष संदर्भ "मनमौन" कवितासंग्रह — डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 128 |
| 34 | सामाजिकशास्त्रामधील संशोधनाची आवश्यकता एक चिंतन — डॉ. आकाश शेषराव नांगर | 135 |
| 35 | सामाजिक संशोधनातील नीतीमूल्य विचार — डॉ. शंकर लेखणे | 140 |



146

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CCCXCVIII) 398-B
ISSN : 2278-9308
March , 2023

# सामाजिक संशोधनात प्रश्नावलीची उपयुक्तता

**प्रा.डॉ. हुरगूळे एन. आर.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

प्रस्तावना

जन्मताच मानव हा प्राणी जिज्ञासू वृत्तीचा आहे. मानवाला ज्या गोष्टी, घटना बद्दल माहिती नाही किंवा त्याचे ज्ञान नाही. त्याविषयीचे ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न मानव करत असतो. आजही मानवाला अनेक गोष्टीचे किंवा घटनांचे ज्ञान नाही. त्याविषयी ज्ञान मिळवण्याचे मानवाचे निरंतर प्रयत्न चालू असतात. अगदी लहान मूल सुद्धा याबाबतचे प्रयत्न करत असते. घरातील देवापुढे लावलेला दिवा असेल तर त्याकडे ते लहान मुल आकर्षित होतं. घरातील मोठ्या व्यक्तींनी त्याला कितीही सांगितले, की त्याला हात लावू नये तरी ते ऐकण्याच्या स्थितीत नसते. जेव्हा त्या दिव्याला स्वतः स्पर्श करतो आणि त्याची अनुभूती त्याला मिळते, तेव्हा तो त्यापासून दूर राहतो. याच जिज्ञासू वृत्तीमुळे , मानवाकडे असणाऱ्या बुद्धीमत्तेमुळे तो सतत आपले व मानवी समाजाचे जीवन कसे सुखकर होईल यासाठी प्रयत्न करत आला आहे. यामधून अनेक शोध लागले आहेत. त्याच्या उपयोगामुळे मानवी जीवन हे सुखकर झालेले आपण आज पाहत आहोत.

मानवी समाजात निर्माण होणाऱ्या मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तो सतत प्रयत्नशील आहे. खऱ्या अर्थाने असे म्हटले जाते की, गरज ही शोधाची जननी आहे. मानवी समाजात सतत नवनवीन गरजा निर्माण होत आहेत व त्या पूर्ण करण्यासाठी मानव सतत प्रयत्न करत आहे. गरजा ह्या अमर्याद आहेत. म्हणून शोध घेण्याची प्रक्रिया सुद्धा मानवी समाजात निरंतर सुरू आहे.

संशोधनास इंग्रजी भाषेत Research असे म्हटले जाते. Research हा शब्द Re आणि search या दोन शब्दापासून तयार झालेला आहे. Re म्हणजे पुन्हा पुन्हा व search म्हणजे शोधणे होय. Research म्हणजे पुन्हा पुन्हा शोध घेणे होय. मानव हा पुन्हा पुन्हा कशाचा शोध घेतो तर त्याचा विचार केला असता असे लक्षात येते, की एखाद्या घटना किंवा घटका विषयी नवीन तत्वे किंवा तथ्य शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे किंवा तथ्याच्या परीक्षणासाठी मानव हा शोध घेत असतो. या शोधालाच संशोधन असे म्हटले जाते. संशोधन हे नवीन ज्ञानाच्या प्राप्तीसाठी आणि जुन्या ज्ञानाच्या परीक्षणासाठी केल्या जाते. कारण मानवी समाज हा परिवर्तनशील आहे. या परिवर्तनशील समाजात जुने नियम किंवा ज्ञान, तत्वे आजच्या समाजात लागू पडतील का ? याचा शोध घेणे आवश्यक ठरते. संशोधन ही एक बौद्धिक प्रक्रिया आहे.

जगाच्या पाठीवरील कोणताच मानवी समाज हा शुद्ध नाही. प्रत्येक मानवी समाजात अनेक प्रश्न किंवा समस्या या निर्माण झालेल्या आहेत. या प्रश्न किंवा समस्येविषयी ज्ञान मिळवणे आवश्यक असते. कारण समस्येमुळे मानवी समाजाचा विकास हा खुंटतो. मानवी समाजाचा विकास करण्यासाठी त्या समाजातील प्रश्न सोडवणे आवश्यक ठरते. त्याचबरोबर मानवी समाजाच्या विकासासाठी काही सुविधा देणे सुद्धा तेवढीच गरजेचे आहे. या सर्व बाबीसाठी त्या समाजाचा अभ्यास होणे आवश्यक ठरत असते. अभ्यासाशिवाय व्यक्तीला ते प्रश्नांची कारणे, परिणाम समजणार नाहीत. व त्यावरील उपाय सुचवता येणार नाहीत. म्हणून या मानवी समाजातील घटना, प्रश्न, समस्या किंवा विद्यमान सिद्धांताच्या संबंधात नवीन ज्ञानाची प्राप्ती करण्यासाठी उपयोगात आणली जाणारी पद्धती म्हणजे सामाजिक संशोधन होय.

147

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CCCXCVIII) 398-B
ISSN : 2278-9308
March , 2023

सामाजिक संशोधनासाठी लागणारी माहिती (तथ्य) हे संशोधकाला जमा करावे लागतात. हे तथ्य संकलनासाठी दोन पद्धती आहेत. एक प्राथमिक तथ्य संकलन व द्वितीय तथ्य संकलन या पद्धतीचा उपयोग सामाजिक संशोधनात करण्यात येतो. प्राथमिक तथ्य म्हणजे उत्तरदात्या (निवेदका)कडून मिळवलेले तथ्य होय. यासाठी सामाजिक संशोधनात निरीक्षण, मुलाखत, अनुसूची आणि प्रश्नावली या तंत्राचा उपयोग केला जातो. प्रश्नावली ही एक प्रश्नाची तालिका असते. ज्या माध्यमातून उत्तरदात्याकडून आपल्या संशोधन विषयाशी संबंधित प्रश्नांची उत्तरे मागवण्यात येतात. हि प्रश्नावली शिक्षित उत्तरदात्यासाठी उपयोगात आणल्या जाते. अशा ह्या प्रश्नावलीचा सामाजिक संशोधनात काय उपयोगिता आहे. ते प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात येत आहे.

**उद्देश :-**

1. सामाजिक संशोधन म्हणजे काय जाणून घेणे.
2. प्रश्नावली म्हणजे काय जाणून घेणे.
3. तथ्य संकलनात प्रश्नावलीचा उपयोग जाणून घेणे.

**गृहीतके :-**

1. मानवी समूहाच्या क्रमबद्ध अध्ययन म्हणजे सामाजिक संशोधन.
2. निवेदकाकडून उत्तरे मागवण्यासाठी तयार केलेली क्रमबद्ध सूची म्हणजे प्रश्नावली होय.
3. विशाल क्षेत्राच्या अध्ययनासाठी उपयुक्त.

**विषय विवेचन :-**

'संशोधन' ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. संशोधन हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. संशोधन हे विशिष्ट प्रश्न किंवा समस्या विषयक ज्ञान मिळविण्यासाठी केले जाते, की ज्याबाबत व्यक्ती हा अनभिज्ञ असतो. त्याविषयीचे ज्ञान मिळविणे हाच मुख्य उद्देश संशोधनाचा असतो. मानवी समाजात ही निरंतर चालणारी एक प्रक्रिया आहे. वेबस्टरच्या शब्दकोशात असे म्हटले आहे की, "संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य भाग आहे"[1] संशोधन हा असा प्रवाह आहे जो कधीही थांबत नाही. एखाद नविन ज्ञान मिळवण्यासाठी सतत व व्यवस्थित केलेले परिश्रम होय. सामाजिक शास्त्रात सामान्य नियम शोधून काढण्यासाठी संशोधन केले जाते. त्यास सामाजिक संशोधन असे म्हणतात. सामाजिक संशोधनाबाबत सी.ए.मोझर असे म्हणतात, "सामाजिक समस्या आणि सामाजिक घटना यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी व्यवस्थितपणे केलेल्या अन्वेषणास सामाजिक संशोधन असे म्हटले जाते"[2] समाजात किंवा सामाजिक समूहात घडणाऱ्या घटनांचे पद्धतशीर ज्ञान मिळवण्यासाठीचा प्रयत्न हा सामाजिक संशोधनाचा भाग ठरतो.

सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग हा मानवी समाजाच्या विकासासाठी केला जातो. व्यक्तीच्या ज्ञानात सुद्धा भर पडत असते. संशोधनाच्या माध्यमातून मिळवलेले ज्ञान किंवा एखाद्या समस्या सोडवण्यासाठी केलेल्या शिफारसीचा उपयोग, धोरण निर्माते, समाजसुधारक, अधिकारी हे समाजाच्या कल्याणासाठी करतात.

सामाजिक संशोधनात एक उपयुक्त असे तथ्य संकलनाचे तंत्र म्हणून प्रश्नावलीकडे पाहिले जाते. सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाचे प्राथमिक तंत्र म्हणून प्रश्नावलीकडे पाहिले जाते. सामाजिक शास्त्रात माहिती संकलनाच्या ज्या काही पद्धती आहेत त्यामध्ये प्रश्नावली हे एक महत्त्वपूर्ण तंत्र आहे. 'पूर्वनियोजित प्रश्नांच्या आधारे माहिती जमा करणे म्हणजे प्रश्नावली होय.' प्रश्नावली लिखित प्रश्नांची यादी असते. असे लिखित यादी एकक म्हणून निवडलेल्या व्यक्तीकडे पोस्टाने पाठविली जाते. उत्तरदाता त्या प्रश्नावलीत आपली उत्तरे भरतो व ती परत टपाली संशोधकास पाठवतो. म्हणजे संशोधकास संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक असणारी माहिती ही पोस्टाद्वारे प्राप्त होत असते. कारण

148

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CCCXCVIII) 398-B
ISSN : 2278-9308
March, 2023

या तंत्रात संशोधक आणि निवेदक यांच्यात कोणत्याच प्रकारचा संपर्क होत नसतो. संपर्काविना अध्ययन विषयाशी संबंधित माहिती संकलित केली जाते. यामुळे संशोधक हा आपला प्रभाव निवेदकावर टाकू शकत नाही. त्यामुळे निवेदकाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळते व तो खरी माहिती लिहू शकतो.

विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधितांकडून त्या संबंधी माहिती मिळावी म्हणून समस्येच्या संदर्भात एक प्रश्नांची यादी तयार केली जाते. त्यालाच प्रश्नावली असे म्हणतात. प्रश्नावली बाबत गुड आणि हॅट असे म्हणतात, "सामान्य रूपात प्रश्नावली म्हणजे प्रश्नांची उत्तरे प्राप्त करून घेण्याची पद्धती असून तिच्यात प्रश्नपत्रिकेचा उपयोग केला जातो आणि जी उत्तर दाता स्वतः भरतो."[3] प्रश्नावली ही विशेष प्रकारच्या प्रश्नांची अनुसूची असून अध्ययन विषयाच्या संबंधित प्राथमिक तथ्यांना एकत्रित करण्यासाठी नमुन्यात निवड केलेल्या लोकांकडे पोस्टाद्वारे पाठविले जाते. प्रश्नावली सोबत एक विनंती पत्र पाठवून प्रश्नावलीतील उत्तरे स्वतः लिहून पाठविण्याची विनंती केली जाते. तेव्हा उत्तरदाते विस्तृत क्षेत्रात मोठ्या संख्येने पसरलेले असतात. त्यामुळे त्यांच्याशी व्यक्तिगत संपर्क साधने संशोधन कर्त्याला अशक्य असते. अशावेळी संशोधनकर्ता प्रश्नावली पद्धतीचा उपयोग करतो.

सामाजिक संशोधनात प्राथमिक तथ्य संकलनाची विविध तंत्र आहेत. प्रश्नावली देखील त्यातील एक तंत्र आहे. हे तंत्र अतिशय महत्त्वाचे आहे. कारण समाज हा परिवर्तनशील आहे. अशा परिवर्तनशील समाजाचा वेळेत अभ्यास करण्यासाठी किंवा विस्तृत क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाला इतर तंत्राच्या वापरामुळे जास्त वेळ लागू शकतो. अशावेळी प्रश्नावलीच्या साह्याने जेव्हा माहिती जमा केली जाते, तेव्हा वेळ, श्रम व पैसा या सर्व गोष्टीची बचत ही होत असते. एखाद्या प्रश्नासंबंधी किंवा समस्ये संबंधित अध्ययन करत असताना मुलाखत, निरीक्षण किंवा अनुसूचीचा वापर केला तर त्यासाठी वेळ, श्रम व पैसा हा जास्त लागतो. कारण या तंत्रात संशोधन कर्त्याला उत्तरदात्याजवळ जावे लागत असते. पण प्रश्नावली ही टपालाने पाठविली जात असल्यामुळे या ठिकाणी या सर्व बाबींची बचत होते. व वेळेत त्या प्रश्नासंबंधी किंवा समस्येविषयी वेळेत अभ्यास होतो व त्यावर उपाय सुचवता येतात. इतर तंत्रात वेळ जास्त लागत असल्यामुळे हे शक्य होत नाही.

सामाजिक संशोधनात एखाद्या प्रश्नाविषयी संशोधकाला पुन्हा- पुन्हा माहिती मिळविणे आवश्यक असते. कारण काही प्रश्न असे असतात की एकदा माहिती घेऊन तथ्यापर्यंत पोहोचणे शक्य नसते. अशा वेळी प्रश्नावलीच्या साह्याने उत्तरदात्याच्या पुन्हा-पुन्हा संपर्कात राहणे व त्यांच्याकडून आवश्यक माहिती घेणे शक्य होते. त्याचबरोबर प्रश्नावलीच्या साह्याने माहिती मिळवणे सुलभ होते. प्रश्नावलीचे वैशिष्ट्य म्हणजे, "उत्तरदात्याची भीती नष्ट करणे, निर्भीडपणे उत्तरदात्याचे प्रकटीकरण."[4] कारण त्या ठिकाणी संशोधक नसतो तर उत्तरदाता एकटाच असतो. त्याच्यावर कोणाचाही प्रभाव नसतो. तो निर्भीडपणे त्यात त्याचे विचार, मत मांडू शकतो.

प्रश्नावली हे माहिती संकलनाची अशी सहज पद्धती असते, की त्यासाठी संशोधकाला कार्यकर्त्याची फळी उभारणे, भरपूर मनुष्यबळ जमवून शोधकार्याची तयारी करणे, सातत्याने प्रवास, भेटी इत्यादीवर होणारा खर्च टळतो. त्याचबरोबर कार्यकर्त्यांनी मिळविलेल्या माहितीमुळे होणाऱ्या गुंतागुंती पासून बचाव होतो. एकदा संशोधक स्वयं प्रशासनाच्या साह्याने घरी किंवा कार्यालयात बसून प्रश्नावलीच्या साह्याने माहिती मिळवतो व त्याचे योग्य असे वर्गीकरण करतो. प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राप्त होणारी माहिती ही विशिष्ट प्रश्नांचे विशिष्ट अशी उत्तर या स्वरूपात असल्याने भरकटणारी प्रश्न भरकटलेली उत्तरे अनावश्यक माहिती टाळून नेमके, वस्तुनिष्ठ आणि सांख्यिकीय प्रयोगाला उपयुक्त माहिती पुढे येते. उत्तराचे स्वरूप बंदिस्त व नेमके असल्यामुळे त्याचा लाभ संशोधकाला तथ्यापर्यंत पोहोचवण्यास मदत करते.

149

निष्कर्ष :-

सामाजिक घटना, प्रश्न व समस्या संबंधी केल्या जाणाऱ्या संशोधनास आपण सामाजिक संशोधन असे म्हणतो. सामाजिक संशोधनाचा उपयोग हा व्यक्ती व समाज यांच्या कल्याणासाठी केला जातो. हे संशोधन करत असताना अध्ययनक्षेत्र विस्तृत असेल तर प्रश्नावली या प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करावा लागतो. प्रश्नावलीच्या साह्याने संशोधक हा एकाच वेळी अनेक व्यक्तींकडून (उत्तर दात्या) माहिती मागवू शकतो. यामुळे संशोधकाचा वेळ, श्रम व पैशाची बचत होते. त्याचबरोबर संशोधक हा उत्तरदात्यासमोर हजर नसल्यामुळे त्याचा प्रभाव उत्तरदात्यावर पडत नाही व उत्तरदात्याला संपूर्ण स्वातंत्र्य मिळते. तो विचारपूर्वक माहिती भरू शकतो. संशोधक हा एकाच ठिकाणी बसून या सर्व गोष्टीवर नियंत्रण ठेवत असतो. व मिळालेल्या माहितीचे सखोल अध्ययन करून त्याचे वर्गीकरण करतो. वर्गीकृत तथ्याचे सारणीकरण करून विश्लेषण केल्या जाते. यामुळे सामाजिक संशोधनात प्रश्नावली हे तंत्र इतर तंत्रापेक्षा अधिक उपयुक्त असे तंत्र आहे.

संदर्भ :-

(1) करे,प्रा.विभीषण.,( 2015),सामाजिक संशोधनाची मूलतत्त्वे, औरंगाबाद,विद्या बुक्स पब्लिशर्स,औरंगपुरा.
(2 ) आगलावे, प्रदीप.,(2008),'सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे',नागपूर,साईनाथ प्रकाशन,
(3 ) आगलावे,प्रदीप.,(2008),' सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', नागपूर, साईनाथ प्रकाशन.
(4 ) डॉ. ढगे एस. के., डॉ.हासे सी. पी., संशोधन पद्धती, पुणे, के. एस. पब्लिकेशन.

150